शनिवार, दि १२ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ५ वा ● किमंत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# जनतेसाठी मैदानात उतरणार

## सतीश घाटगे यांची भूमिका; भाजपचा कार्यकर्ता संवाद मेळावा, घनसावंगी जागा भाजपलाच सुटावी, पदाधिकारी-कार्यकर्त्यांचा सूर

**घनसावंगी । प्रतिनिधी -** आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने घनसावंगी विधानसभेतील भाजपा कार्यकर्ते व पदाधिकारी यांचा शुक्रवारी संवाद मेळावा झाला. या मेळाव्यास घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील हजारो कार्यकर्त्यांनी हजेरी लावून घनसावंगी विधानसभेची जागा भाजपला सोडून सतीश घाटगे यांना उमेदवारी देण्याची आग्रही मागणी पक्षांच्या नेत्याकडे केली. सतीश घाटगे यांनीही आपली भूमिका या मेळाव्यात जाहीर करत घनसावंगीची जागा सोडणार नाही, वेळप्रसंगी जनतेसाठी मैदानात उतरणार, अशा शब्दात निवडणूक लढविण्याचे संकेत दिले.

या मेळाव्यास भारतीय जनता पार्टीची जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर भांदर्गे, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, पक्ष निरीक्षक गौतम गोलच्छा, विजय कामड , भाजपा तालुका अध्यक्ष शिवाजीराव बोबडे, डॉ. रमेश तारगे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष शिवाजीराव कंटुले , राहुल पाटील कणके, जिल्हा उपाध्यक्ष शिवाजीराव मोरे, रामेश्वर माने , पुरुषोत्तम उढाण , पांडुरंग भांगे यांच्यासह सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

घनसावंगी शहरातील तहसील रोड शेजारी हा कार्यकर्ता संवाद मेळावा पार पडला. या मेळाव्यास अंबड, जालना आणि घनसावंगी तालुक्यातील हजारो भाजप कार्यकर्ते व गावागावातून सतीश घाटगे यांच्या समर्थक मोठ्या संख्येने आले होते. या मेळाव्यात भाजप कार्यकर्ते पदाधिकारी व सतीश घाटगे यांच्या समर्थकांनी आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सतीश घाटगे यांनाच उमेदवारी मिळावी, अशी आग्रही मागणी पक्षाच्या नेत्याकडे व पक्ष निरीक्षकांकडे केली. तसेच सतीश घाटगे विधानसभा



निवडणुकीत जी भूमिका घेतील त्या भूमिकेसोबत कार्यकर्ते व पदाधिकारी जातील, असेही कार्यकर्त्यांनी स्पष्ट केले.

या मेळाव्यात अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या त्यानंतर भाजप जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे यांनीही घनसावंगीची जागा भाजपला सुटावी अशीच पान ३ वर

युवा आदर्श

### दसरा सोने ...

दसऱ्यांस स्वर्ण खरेदी
ही परंपरागत कावड
बावनकशी रे शुध्दत्व
करी चोखंदळ निवड
निमित्ताने बचतभली
आपसूक होई आवड
स्व धन आपले कामी
असेल जेधवा निकड
हरेक जण घेतो सोने
स्थितीअसून अवघड
भावभिडले गगनाला
ऊरात किती धड धड
मुहूर्त नको टाळायला
कशी केवढी धड पड
केलीचं पाहिजे खरेदी
असो भावजरी वरचढ
फायदा घेतात व्यापारी
कळेना कुणा लफ्फड
तिजोरी भरे सोनारांची
बजेट वाजते खडखड
कुणी म्हणेल सोने हे
तिजोरी बंदिस्त दगड
गुंतवून ठेवावी लक्ष्मी
कमाई ज्याला रग्गड
सुवर्ण मध्य साधा नीट
जेवढी आपली निकड
अंथरूण पाहूनि पाय
असे मुहूर्त जरी धाकड

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

संजय गांधी निराधार योजनेसंदर्भाने बैठक; विलंब करणाऱ्यास खडसावले

# आचारसंहितेपुर्वी लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा होणार - लोणीकर



**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्रातील विद्यमान मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सरकार हे सर्वसामान्य गोरगरीब जनतेचे सरकार असून अत्यंत गतिमान पद्धतीने काम करणारे सरकार आहे सर्वसामान्य नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ व्हावा यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणारे हे सरकार असून या सरकारच्या माध्यमातून अधिकाधिक लाभार्थ्यांना प्रत्यक्ष योजनेचा लाभ कसा मिळवून देता येईल यासाठी यापूर्वी देखील प्रयत्न केले आहेत आणि यापुढे देखील प्रयत्न केले जातील असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले

आज जालना जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित संजय गांधी निराधार योजना संदर्भातील महत्त्वपूर्ण बैठक आमदार बबनराव लोणीकर व जिल्हाधिकारी डॉ श्रीकृष्ण पांचाळ यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पार पडली परतुर विधानसभा मतदारसंघातील लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी आमदार लोणीकरांनी सातत्याने प्रयत्न केले असून आचारसंहितेपूर्वी संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यात पेन्शन जमा होईल यासाठी सातत्याने लोणीकरांनी पान ३ वर

# राजुर येथील शाळेत दिले स्वसंरक्षणाचे धडे

## जिल्हा पोलिस प्रशासनाचा उपक्रम



**जालना । प्रतिनिधी -** पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल व अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार (दि ११) रोजी राजुर येथील गणपत दादा इंग्लिश स्कूलसह मोरेश्वर व उच्च माध्यमिक स्कुल राजुर, मोरेश्वर कनिष्ठ महाविद्यालय राजुर तसेच जिल्हा परिषद स्कुल राजुर यासर्व शाळेतील मुली व महिलांच्या सुरक्षा करिता तीन दिवसीय सेल्फ डिफेन्स कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे उदघाटन दिनांक संजय अहिरे सह. पोलीस निरीक्षक पो. स्टे हसनाबाद यांच्या हस्ते करण्यात आले होते. शिबीरा दरम्यान मुली महिला यांना आपल्याकडील साहित्याचा वापर करुन पान ३ वर

# जालना-नांदेड समृद्धी महामार्गाला शेतकऱ्यांचा विरोध

## शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन; मुल्यांकन किंमत घटवल्याने शेतकऱ्यांचा जमीन देण्यास विरोध

**जालना । प्रतिनिधी -** जालना ते नांदेड या समृद्धी महामार्गाला शेतकऱ्यांनी विरोध करत जालना एसडीएम कार्यालयासमोर शुक्रवार (दि ११) रोजी दुपारी १२ वाजेदरम्यान ठिय्या आंदोलन केले. १९५५ चा कालबाह्य कायद्याचा वापर करून शासन शेतकऱ्यांची फसवणूक करत आहे. मुल्यांकन घटवून शेतकऱ्यांची जमीन संपादित करत आहेत. त्याचबरोबर जमीन संपादित नसतानाही याची कंत्राटे वाटली गेली आहेत. त्यामुळे जमीन देण्यास शेतकऱ्यांचा विरोध असून १९५५ चा महामार्ग कायदा रद्द करून २०१३ च्या कायद्याच्या नवीन तरतुदी लागू कराव्यात. तोपर्यंत शेतकरी जमीन देणार असल्याची भूमिका या शेतकऱ्यांनी घेतली असून जालना एसडीएम कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले.

शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सर्व जालना नांदेड समृद्धी महामार्गामध्ये बाधित शेतकरी आहोत. आम्हा सर्व शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह वर्षानुवर्षे शेती या प्रमुख व पारंपरिक व्यवसायावर अवलंबून आहे. परंतु आमच्या दुर्दैवाने आम्हा शेतक:याच्या जमिनी समृद्धी महामार्गातील विस्तारीत जालना नांदेड समृद्धी महामार्गामध्ये जात आहेत. भुसंपादनाच्या मावेजा संदर्भात १९ ब च्या नोटीसा आम्हा सर्व बाचित शेतकऱ्यांना जाल्या होत्या त्यामध्ये महामार्गामध्ये भुसंपादनाचे बाधित क्षेत्र ज्ञाणि त्याला मिळणारा मावेजाची रक्कम यांचा समावेश होता. हा मिळणारा मावेजा मोबदला अत्यंत कमी निक्षित करण्यात आलेला होता परंतु नियमबाह्य पद्धतीने नुमंतदीत जमिनींचा मावेजा मोबदला आम्हा सर्व शेतकऱ्यांना परवडणारे नाही आमची या गोष्टीला गंमती नाही च सरळ मरठ आम्हा सर्व शेतकयांचा विरोध आहे. आम्ही सर्व बाधित शेतकऱ्यांनी हरकती च्या माध्यमातून वैयक्तिक, सामुहिक हरकती नोंदविल्या आहे. परंतु आमच्या हरकती निकाली न काढता बाता दमदाटी करत जमीनीचा पान ३ वर



# संपादकीय

## दसरा सण मोठा नाही आनंदाला तोटा

आज आश्विन शुद्ध दशमी म्हणजेच विजया दशमी. दसरा म्हणूनही हा सण सर्वत्र साजरा केला जातो. दसऱ्याच्या आधी नऊ दिवस देवीचा जागर करून नवरात्र साजरा केला जातो. नवरात्रीची सुरुवात आश्विन महिन्याच्या पहिल्या दिवशी घट बसवून केली जाते. नऊ दिवस देवीची आराधना केल्यानंतर दहाव्या दिवशी दसरा साजरा केला जातो. दसरा सणासारखा आनंद इतर कोणत्याही सणात नसतो म्हणूनच दसरा सण मोठा नाही आनंदाला तोटा असे म्हंटले जाते. देवीने महिषासुराशी युद्ध करून त्याला मारला तोच हा दिवस. प्रभू रामरायांनी रावणाचा वध केला तो हा दिवस. रजपूत काय किंवा मराठे वीर काय ह्यांनी युद्ध मोहिमांना प्रारंभ केला तोच हा दिवस. ह्या दिवशी शस्त्र पूजा सुद्धा करतात. पाटीवर सरस्वती काढून तिची पूजा करतात. पराक्रमाचा आनंद देण्या-घेण्याचा परस्परांत प्रेम वाढवण्याचा हा एक दिवस सुंदर सण-दसरा. अज्ञानावर ज्ञानाने, शत्रूवर पराक्रमाने, वैऱ्यावर प्रेमाने विजय मिळवायचा. आंनद, समाधान आणि सोबत संपदा मिळवून आणायची. यश किर्ती प्राप्त करायची धनसंपदा लुटायची आणि लुटवायची हा दिवस. दसरा ह्या सणांच मोठ्या उत्साहाने स्वागत होते. हा साडेतीन मुहुर्तातला एक मुहुर्त म्हणूनच दसऱ्याच्या मुहुर्तावर नवी खरेदी, नवे करार, नव्य योजनांच्या प्रारंभ इ. चांगल्या गोष्टी केल्या जात. घर, गाडी, बंगला, खरेदी केला जातो. सोन्या चांदीचे दागिने केले जातात. नवे व्यवसाय चालू केले जातात. नवी नाटके, चित्रपट ह्यांचे मुहुर्त होतात. पुस्तक प्रकाशीत केली होतात. ह्या दिवशी घरोघरी मिष्टान्नाचा बेत केला जातो. संध्याकाळी आपट्याची पाने सोनं म्हणून लहानांनी मोठ्यांना द्यायची. त्यांच्या पाया पडायचे आणि लाख मोलाचे आशिर्वाद घ्यायचे ते ही ह्याच दिवशी. हा सण प्रत्येकाला आनंद देऊन जाणारा आहे. विजयादशमी अर्थात दसऱ्याच्या आपणास व आपल्या परिवारास मनपुर्वक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## १४ ऑक्टोबर धम्म चक्र प्रवर्तन दिनी सामूहिक बुद्ध वंदना

**जालना । प्रतिनिधी -** महामानव, बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्ध धम्माची दीक्षा अनुयायांना देऊन ६८ वर्षे पूर्ण होत आहेत . त्यानिमित्ताने १४ ऑक्टोबर रोजी धम्मचक्र प्रवर्तन दिनी सामूहिक बुद्ध वंदना आयोजित करण्यात आली आहे . बुद्ध वंदना व धम्म देसना देण्यासाठी नालंदा बुद्धविहार संघभूमी नागेवाडी येथील पूज्य भन्ते धम्मधर शाक्यपुत्र थेरो, पूज्य भन्ते शिवली शाक्यपुत्र , रामनगर येथील पूज्य भन्ते रेवत यांची उपस्थिती राहणार आहे . या कार्यक्रमाला समाज बांधवांनी जालना शहरातील मस्तगड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क या ठिकाणी सकाळी ९ वाजता उपस्थित रहावे . असे आव्हान ड . बी. एम . साळवे, ड . ब्रम्हानंद चव्हाण, गणेश रत्नपारखे, सुधाकर रत्नपारखे, प्रमोदकुमार रत्नपारखे, महेंद्र रत्नपारखे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला अध्यक्ष आण्णासाहेब चित्तेकर, सचिव संजय हेरकर, कार्याध्यक्ष सुनिल रत्नपारखे, कोषाध्यक्ष भास्कर घेवंदे, डॉ. आंबेडकर सर्वपक्षिय जयंती उत्सव समिती अध्यक्ष सचिन कांबळे, सचिव ड . सिद्धार्थ चव्हाण, कार्याध्यक्ष कपिल खरात, कोषाध्यक्ष प्रविण रत्नपारखे आदिंनी केले आहे .

# दसरा (विजयादशमी) सणाचे महत्त्व

आश्विन शुद्ध दशमी, म्हणजेच विजयादशमी. हिंदूंचा एक प्रमुख सण आणि साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असणार्या दसरा (विजयादशमी) या सणाची अनेक वैशिष्ट्ये आहेत. दुर्गानवरात्र संपल्यानंतर लगेच हा दिवस येतो; म्हणून याला 'नवरात्रीच्या समाप्तीचा दिवस' असेही मानतात. अगदी त्रेतायुगापासून हिंदु लोक विजयादशमी महोत्सव साजरा करत आलेले आहेत. विजयाची प्रेरणा देणारा आणि क्षात्रवृत्ती जागृत करणारा हा सण परस्परांतील प्रेम वृद्धींगत करायलाही शिकवतो. दसर्याला सीमोल्लंघन, शमीपूजन, अपराजितापूजन आणि शस्त्रपूजा ही चार कृत्ये करायची असतात. तसेच या दिवशी सरस्वती पूजनही केले जाते. या सणाचे असलेले अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेता याविषयीचा इतिहास, महत्त्व तसेच हा सण साजरा करण्याची पद्धत या लेखातून आपण थोडक्यात जाणून घेणार आहोत.

व्युत्पत्ती आणि अर्थ : दसरा शब्दाची एक व्युत्पत्ती दशहरा अशीही आहे. दश म्हणजे दहा आणि हरा म्हणजे हरल्या आहेत. दसर्याच्या आधीच्या नऊ दिवसांच्या नवरात्रात दाही दिशा देवीच्या शक्तीने भारलेल्या असतात. नियंत्रणात आलेल्या असतात, म्हणजेच दाही दिशांतील दिक्भव, गण इत्यादींवर नियंत्रण आलेले असते, दाही दिशांवर विजय मिळालेला असतो.

इतिहास : रामाचा पूर्वज रघु या अयोध्याधिशाने विश्वजित यज्ञ केला. त्याने सर्व संपत्तीचे दान केले. नंतर तो एका पर्णकुटीत राहिला. कौत्स तिथे आला. त्याला गुरुदक्षिणा म्हणून देण्यासाठी १४ कोटी सुवर्णमुद्रा हव्या होत्या. रघु कुबेरावर आक्रमण करण्याला सिद्ध झाला. कुबेराने आपटा आणि शमी या वृक्षांवर सुवर्णाचा वर्षाव केला. कौत्साने केवळ १४ कोटी सुवर्णमुद्रा घेतल्या. बाकीचे सुवर्ण प्रजाजनांनी नेले. त्या काळापासून, म्हणजेच त्रेतायुगापासून हिंदु लोक विजयादशमी महोत्सव साजरा करत आहेत.

प्रभु श्रीराम याने रावणावर विजय मिळवून त्याचा वध केला, तोही याच दिवशी. या अभूतपूर्व विजयामुळे या दिवसाला 'विजयादशमी' असे नाव मिळाले आहे.

पांडवांनी अज्ञातवास संपताच शक्तीपूजन करून शमीच्या वृक्षावरची आपली शस्त्रे परत घेतली आणि विराटाच्या गायी पळवणार्या कौरवसैन्यावर स्वारी करून विजय मिळवला, तोही याच दिवशी.

दसऱ्या या दिवशी इष्टमित्रांना आपट्याची पाने 'सोने' म्हणून वाटण्याची प्रथा महाराष्ट्रात आहे. या प्रथेलाही ऐतिहासिक महत्त्व आहे. मराठे वीर मोहिमेवर गेल्यानंतर शत्रूचा प्रदेश लुटून सोन्यानाण्यांच्या रूपाने संपत्ती घरी आणत असत. असे हे विजयी वीर किंवा शिलेदार मोहिमेवरून परत आले की, दारात त्यांची पत्नी किंवा बहीण त्यांना ओवाळीत असे. मग ते परमुलखातून लुटून आणलेल्या त्या संपत्तीतला एखादा नग त्या ओवाळणीच्या तबकात टाकीत असत. घरात गेल्यावर आणलेली लूट देवापुढे ठेवीत. नंतर देवाला आणि वाडवडिलांना नमस्कार करून आशीर्वाद घेत असत. या घटनेची स्मृती सध्याच्या काळात आपट्याची पाने सोने म्हणून वाटण्याच्या रूपाने शिल्लक उरली आहे.

हा सण एक कृषीविषयक लोकोत्सव म्हणूनही साजरा होत असे. पावसाळ्यात पेरलेले पहिले पीक घरात आल्यावर शेतकरी हा उत्सव साजरा करीत. नवरात्रात घटस्थापनेच्या दिवशी घटाखालच्या स्थंडिलावर नऊ धान्यांची पेरणी करतात आणि दसर्याच्या दिवशी त्या धान्यांचे वाढलेले अंकुर उपटून देवाला वाहतात.




कित्येक ठिकाणी शेतातल्या भाताच्या लोंब्या तोडून आणून त्या प्रवेशद्वारावर तोरणासारख्या बांधतात. ही प्रथाही या सणाचे कृषीविषयक स्वरूपच व्यक्त करते. तसेच तो एक राजकीय स्वरूपाचा सणही ठरला.

सण साजरा करण्याची पद्धत : या दिवशी सीमोल्लंघन, शमीपूजन, अपराजितापूजन आणि शस्त्रपूजा ही चार कृत्ये करायची असतात.

सीमोल्लंघन : अपराण्हकाली (तिसर्या प्रहरी, दुपारी) गावाच्या सीमेबाहेर ईशान्य दिशेकडे सीमोल्लंघनासाठी जातात. जिथे शमीचा किंवा आपट्याचा वृक्ष असेल, तिथे थांबतात.

शमीपूजन : पुढील श्लोकांनी शमीची प्रार्थना करतात.

शमी शमयते पापं शमी लोहितकण्टका । धारिण्यर्जुनबाणानां रामस्य प्रियवादिनी ।।
करिष्यमाणयात्रायां यथाकाल सुखं मया । तत्र निर्विघ्नकर्त्री त्वं भव श्रीरामपूजिते ।।

अर्थ : शमी पाप शमवते (नष्ट करते). शमीचे काटे तांबूस असतात. शमी रामाला प्रिय असून अर्जुनाच्या बाणांना धारण करणारी आहे. हे शमी, रामाने तुझी पूजा केली आहे. मी यथाकाल विजययात्रेला निघणार आहे. ही यात्रा तू मला निर्विघ्न आणि सुखकारक कर.

आपट्याचे पूजन : आपट्याची पूजा करतांना असल्यास पुढील मंत्र म्हणतात -

अश्मन्तक महावृक्ष महादोषनिवारण । इष्टानां दर्शनं देहि कुरु शत्रुविनाशनम् ।।

अर्थ : हे अश्मंतक महावृक्षा, तू महादोषांचे निवारण करणारा आहेस. तू मला माझ्या मित्रांचे दर्शन घडव आणि माझ्या शत्रूंचा नाश कर. नंतर त्या वृक्षाच्या मुळाशी तांदूळ, सुपारी आणि सुवर्णनाणे (विकल्पाने तांब्याचे नाणे) ठेवतात. मग वृक्षाला प्रदक्षिणा घालून त्याच्या बुंध्याजवळची थोडी माती आणि त्या वृक्षाची पाने घरी आणतात.

आपट्याची पाने सोने म्हणून देणे : शमीची नाही; पण आपट्याची पाने सोने म्हणून देवाला वाहतात आणि इष्टमित्रांना देतात. सोने हे लहानांनी मोठ्यांना द्यायचे असते, असा संकेत आहे. आपट्याची पाने तेजतत्त्वाच्या लहरींनी युक्त असतात. आपट्याची पाने स्वीकारणाऱ्याला दसऱ्याच्या दिवशी जास्त प्रमाणात कार्यरत असलेले श्रीरामतत्त्व आणि मारुतितत्त्व यांचा सहज लाभ होतो. दसर्याला श्रीराम आणि हनुमान यांचे स्मरण केल्याने जिवात दास्यभक्ती निर्माण होऊन श्रीरामाचे तारक, म्हणजेच आशीर्वादरूपी तत्त्व मिळण्यास साहाय्य होते.

अपराजितापूजन : ज्या ठिकाणी शमीची पूजा होते, त्याच ठिकाणी भूमीवर अष्टदल काढून त्यावर अपराजितेची मूर्ती ठेवतात आणि तिची पूजा करून पुढील मंत्राने प्रार्थना करतात.

हारेण तु विचित्रेण भास्वत्कनकमेखला । अपराजिता भद्ररता करोतु विजयं मम ।।

अर्थ : गळ्यामध्ये चित्रविचित्र हार घालणारी, जिच्या कटीत चकाकणारी सुवर्णमेखला आहे, अशी आणि (भक्तांचे) कल्याण करण्याच्या कामी तत्पर अशी अपराजितादेवी मला विजय देवो. काही ठिकाणी अपराजितेची पूजा सीमोल्लंघनाला निघण्याच्या पूर्वीही करतात.

शस्त्रे आणि उपकरणे यांचे पूजन : या दिवशी राजे, सामंत आणि सरदार हे वीर आपापली उपकरणे आणि शस्त्रांचे पूजन करतात. त्याचप्रमाणे शेतकरी आणि कारागीर हे आपापली आऊते आणि हत्यारे यांची पूजा करतात. (काही लोक ही शस्त्रपूजा नवमीच्या दिवशीही करतात.) लेखणी आणि पुस्तके ही विद्यार्थ्यांची शस्त्रेच होत; म्हणून विद्यार्थी त्यांचे पूजन करतात. या पूजनामागील उद्देश हा की, त्या त्या गोष्टींमध्ये ईश्वराचे रूप पाहणे, अर्थात ईश्वराशी एकरूपता साधण्याचा प्रयत्न करणे.

सरस्वती पूजन : या दिवशी सरस्वती पूजनही करतात. दसऱ्याला कार्यरत असलेल्या श्री सरस्वतीच्या मारक तत्वाच्या लहरींचा लाभ होऊन पूजकातील क्षात्रतेज जागृत होते.

राजविधान : दसरा हा विजयाचा सण असल्यामुळे या दिवशी राजेलोकांना विशेष विधान सांगितले आहे.

लौकिक प्रथा : काही घराण्यांतील नवरात्रींचे विसर्जन नवमीच्या दिवशी, तर काहींचे दशमीच्या दिवशी करतात.

संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण,धार्मिक उत्सव आणि व्रते'

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे,**
**सनातन संस्था संपर्क- ९२८४०२७१८०**

## देवी मुर्ती विसर्जन कालावधीत घाणेवाडी तलावाजवळ प्रतिबंधात्मक आदेश लागु

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात व शहरात दि. ३ ऑक्टोबर, २०२४ ते दि. १२ ऑक्टोबर, २०२४ पासून नवरात्र उत्सव साजरा होत असून, दि. ११ ऑक्टोबर, २०२४ व दि. १२ ऑक्टोबर, २०२४ रोजी देवी मुर्ती विसर्जनाकरीता मोतीबाग तलाव येथे व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी विसर्जनासाठी गर्दी असल्यास काही देवी मुर्ती विसर्जनाकरीता घाणेवाडी तलाव येथे विसर्जनासाठी जाण्याची शक्यता आहे. घाणेवाडी तलावातून पिण्याचे पाणी जालना शहरात येत असल्याने तेथे देवी मुर्ती विसर्जनासाठी गेल्यास गावकरी त्यास विरोध करु शकतात, त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दि. ११ ऑक्टोबर, २०२४ व दि. १२ ऑक्टोबर, २०२४ रोजी देवी मुर्ती विसर्जन कालावधीत व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने भारतीय नागरीक सुरक्षासंहिता २०२३ चे कलम १६३ अंतर्गत घाणेवाडी तलावाच्या २०० मीटर परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रतिबंधात्मक आदेश लागु करीत आहे.

अपर जिल्हादंडाधिकारी यांच्या आदेशानुसार भारतीय नागरिक सुरक्षासंहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये घाणेवाडी तलावाच्या २०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू राहणार आहेत. हा आदेश दि. ११ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या ६.०० वाजेपासून ते दि. १३ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या ६.०० वाजेपर्यंत अंमलात राहणार असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी यांनी कळविले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

## पान १ व ४ वरुन

### जनतेसाठी मैदानात ...

मागणी पक्ष श्रेष्ठीकडे केल्याचे सांगितले. पक्ष निरीक्षक गौतम गोलेच्छा यांनी  सतीश घाटगे यांच्या कार्याचे कौतुक केले. तसेच घनसावंगी विधानसभेत भाजपसाठी वातावरण पोषक असल्याचे सांगत पक्ष श्रेष्ठीकडे घनसावंगी विधानसभेची जागा सोडण्यासाठी शिफारस करणार असल्याचे सांगितलं.

**पदाधिकारी, कार्यकर्ते सतीश घाटगे सोबत**

गेल्या अनेक वर्षापासून महायुतीमधील पक्षाच्या उमेदवारासाठी काम करत आला आहे. परंतु त्यांना यश आले नाही. आता भाजप मतदारसंघात मजबूत झाला असून आगामी निवडणूक जिंकू शकतो. त्यामुळे ही जागा भाजपलाच सुटली पाहिजे. जनभावनेचा आदर न झाल्यास सतीश घाटगे यांच्या पाठीमागे उभा राहण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी या मेळाव्यात केला.

### आचारसंहितेपुर्वी ...

पाठपुरावा केलेला आहे

संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत मागील वर्षभरात परतूर मंठा व जालना ग्रामीण (नेर सेवली) या तीनही तालुक्यात निराधार श्रावण बाळ दिव्यांग विधवा परित्यक्ता दुर्धर आजार ग्रस्त बंधू-भगिनींसाठी ३०५७ लाभार्थ्यांना पेन्शन मंजूर करण्यात आलेले आहे त्यासाठी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी तालुकास्तरावर प्रत्येक तहसील कार्यालयात वारंवार बैठका घेतल्या या सर्व लाभार्थ्यांना सोयीचे व्हावे यासाठी मंगल कार्यालयांमध्ये अनेक वेळा मिळावे घेण्यात आले कॅम्प घेण्यात आले त्यामधून या सर्व पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात आली त्यासाठी लोणीकरांनी स्वतः पुढाकार घेतलेला होता जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झालेल्या बैठकीला जिल्हाधिकारी डॉ श्रीकृष्ण पांचाळ निवासी जिल्हाधिकारी गणेश महाडिक अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री बनसोडे प्रकल्प संचालक जालना मंठा व परतुर तालुक्याचे गटविकास अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालयातील संजय गांधी निराधार योजनेच्या तहसीलदार तसेच जालना मंठा व परतुर तालुका संजय गांधी निराधार योजनेचे नायब तहसीलदार उपस्थित होते

मागील वर्षभरात सातत्याने पाठपुरावा करून आमदार बबनराव लोणीकर यांच्या माध्यमातून संजय गांधी निराधार श्रावण बाळ दिव्यांग विधवा परिकथा दुरधराग्रस्त अशा ३०५१ लाभार्थ्यांच्या खात्यात त्यांच्या पेन्शनची रक्कम सुरळीतपणे सुरू असून आमदार बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सप्टेंबर महिन्यामध्ये झालेल्या बैठकीदरम्यान मंठा तालुक्यातील ८२५ परतूर तालुक्यातील ८०३ जालना तालुक्यातील ४१८ अशा एकूण २०४६ लाभार्थ्यांना पेन्शन मंजूर करण्यात आली आहे अशी माहिती देखील यावेळी लोणीकरांनी दिली

अनेक लाभार्थी या योजनेपासून वंचित राहिले होते याची दखल घेत आमदार लोणीकरांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात या बैठकीच्या आयोजन केले होते या सर्व पात्र लाभार्थ्यांना न्याय मिळवून देण्यामध्ये कुचराई करणाऱ्या अधिकाऱ्यांना धारेवर धरत आमदार बबनराव लोणीकर यांनी कामात गय करणाऱ्या अधिकाऱ्यांना चांगलेच खडसावले या सर्व पात्र लाभार्थ्यांना तात्काळ मंजुरी देऊन आचारसंहिते पूर्वी या सर्व पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात पेन्शनची रक्कम जमा करा अशा शब्दात लोणीकरांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आचारसंहिता पूर्वी या सर्व लाभार्थ्यांच्या खात्यात पेन्शनची रक्कम जमा झाली तर दसरा दिवाळी या सणासुदीच्या दिवसांमध्ये या गोरगरीब लाभार्थ्यांना दिलासा मिळेल अशी माहिती यावेळी लोणीकरांनी दिली

### राजुर येथील ...

स्वतःचा व इतरांचा बचाव किंवा संरक्षण कशाप्रकारे करायाचे व सायबर क्राईम बाबत माहिती देण्यात आली तसेच तात्काळ पोलीस सेवेचा वापर त्यामध्ये डायल ११२ व १९३० बाबत माहिती देण्यात आली व प्रात्याक्षिक (डेमो) दाखविण्यात आले. कार्यक्रमामध्ये ११०० ते १२०० महिला मुलींनी सहभाग नोंदवुन प्रात्याक्षिक करुन दाखविले. तसेच आज दिनांक ११/१०/२०२४ रोजी समारोप करण्यात आला असुन कार्यक्रमाचे अध्यक्ष अजय कुमार बन्सल पोलीस अधिक्षक जालना यांनी सांगितले की, सदर प्रशिक्षण खास मुली व महिलांसाठी तयार करण्यात आलेले आहे. मुली व महिलांनी आचानक आलेल्या संकटाला सामोरे जाताना या टेक्नीक चा वापर करुन स्वतःचे रक्षण करायाचे आहे. दामिनी पथक व इमर्जन्सी सेवा तात्काळ तुमच्या मदतीला धावुन येतील, जिल्हयात कुठेही छेडछाड प्रकार किंवा अतिप्रसंगी घाडु नये घडल्यास योग्य वेळी सेल्फ डिफेन्स चा वापर करावा. तसेच मुली व महिलांनी स्वतःची काळजी घ्यावी आम्ही नेहमीच तुमच्या संरक्षणासाठी तत्पर आहोत शाळा भरण्याच्या व शाळा सुटण्यावेळी पोलीस पेट्रोलींग करण्यात येईल असे सांगुन मुलींमध्ये आत्मविश्वास निर्माण केला व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रमुख पाहुणे आयुष नोपाणी अपर पोलीस अधिक्षक जालना, गणपत दराडे उपवि. पो. अधि भोकरदन. ज्ञानेश्वर पुंगळे (गणपत दादा इंग्लिश स्कुल राजुर अध्यक्ष), शामराव आप्पा पुंगळे जेष्ठ पत्रकार, संजय पुंगळे पत्रकार, सोनुने (मुख्याध्यापक मोरेश्वर कॉलेज राजुर), आशाताई पुंगळे प्राचार्या गणपत दादा कॉलेज राजुर, सीमा सहाणे जिल्हा परिषद शाळा राजुर, महिला पोलीस अंमलदार कल्पना बोडखे, मेघा नागलोत, भरतकुमार चौधरी, खडे, दीपक सोनुने, प्रकाश बोर्ड तसेच मुली व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या कार्यक्रमाचे आयोजन व प्रास्तावना संजय अहिरे सहा. पोलीस निरीक्षक हसनाबाद यांनी सांगितले व सुत्रसंचालन आभार प्रदर्शन संजय सोनवणे ने. स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी केले.

### जालना -नांदेड ...

ताबा सोडून देण्याबाबतच्या नोटीसा बजावल्या आहेत. त्या नोटीसा शेकऱ्यांना मान्य नसून नोटीसांना बाधीत शेतकरी बांधवांनी सामुहिक हरकती नोंदवित असल्याचेही निवेदनात नमूद आहे.

आंदोलनातील प्रमुख मागण्यांमध्ये फेरमूल्यांकन करणे व जमिनीची बागायती नोंद करून यागायती प्रमाणे मावेजा देणे, join-mesurment परिशिष्ट (१६) मध्ये ज्या बाबींचा समावेश आहे त्याचा योग्य मोबदला देण्यात यावा., चालु बाजारभावाप्रमाणे पाचपट मोबदला मिळाला पाहिजे, जमीन ताबा सोडून देण्याच्या १९ (१) च्या नोटीसा रद्द झाल्या पाहिजे., जालना, शहरालगत असलेल्या पानसेंद्रा, देवमुर्ती, राममुर्ती, सिंधी काळेगाव, गवळी पोखरी, रामनगर, रीरि कल्याण शिवारातील शेतजमीनींचे दर यलो झोन प्रमाणे देणेबाबत., रोड टच च्या जमिनींचे योग्य मुल्यांकन करून मावेजा निश्चित करणे., शेतजमीनीचे दर निश्चित करत असताना जमिनीमध्ये बोअरवेल, विहीर, पाटबंधारे कमांड एरिया मध्ये असलेल्या शेतजमीनीला बागायती शेतजमीन समजून मावेजा देण्यात यावा., शेतजमिनीचे एकुण मुल्यांकन करत असताना एकत्रित मोजणी होऊन क्षेळपीं ाशीीाशपीं परिशिष्ट १६ त्यावर नमुद अशा बाबींचे योग्य दर व सविस्तर तपशीलासह परिपत्रक देण्यात यावे., अधिसूचना जारी झाल्यापासून शेतकऱ्यांना शेतजमिनीचा मावेजा देत असताना त्यावर १२% व्याज शासन नियमाप्रमाणे देण्यात यावे यासह विविध मागण्यांचा समावेश असून शासनाने फेरमूल्यांकन करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा असेही शेवटी म्हटले आहे.

# मौलाना इलियास खान फलाही यांनी महाराष्ट्रात बिघडत चाललेल्या धार्मिक सलोख्याबद्दल केली चिंता व्यक्त

**जालना । प्रतिनिधी -** जमात-ए-इस्लामी हिंद (JIH), महाराष्ट्राचे अध्यक्ष मौलाना इलियास खान फलाही यांनी महाराष्ट्रातील बिघडत चाललेल्या धार्मिक सलोख्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

माध्यमांना दिलेल्या  निवेदनात मौलाना इलियास फलाही म्हणाले, महाराष्ट्रभरात वाढत चाललेल्या सांप्रदायिक तणावाची परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे, ज्याकडे त्वरित लक्ष देऊन  कारवाई करणे आवश्यक आहे. भिवंडीपासून बुलढाणा, अकोला ते लातूर, अशा विविध भागात व एकूण देशांतर्गत अशा घटनांची पुनरावृत्ती होत आहे. या समस्येचे मूळ समाजातील वाढती असहिष्णुता आणि द्वेषभावना आहे. राज्यात ज्या प्रकारे भडकाऊ भाषणे केली जात आहेत, तीच या हिंसाचारावाढीचे मूळ कारण आहे. काही प्रकरणांत तर हजरत मुहम्मद (झइणक) यांच्याविरोधात अपमानास्पद वक्तव्येही करण्यात आली आहेत, ज्यामुळे समाजातील नैतिकतेणे किती खालची पातळी गाठली आहे हे दिसून येते. काही प्रकरणांत पोलिसांनी योग्य वेळी कारवाई केली आहे, मात्र आमच्या मते त्यांचे प्रयत्न कमी पडत आहेत. राज्यातील बिघडलेली स्थिती ही द्वेश आणि स्वार्थावर आधारित राजनीती चा थेट परिणाम आहे. काही देशविघटनकारी शक्ती या परिस्थितीचा स्वतःच्या स्वार्थासाठी फायदा करून घेत आहेत, आणि लोकातील सामंजस्य व राष्ट्राची एकतेला तडा जात आहे.



JIH महाराष्ट्राचे अध्यक्ष म्हणाले, ज्यांनी द्वेष पसरवला आणि हिंसाचार भडकवला आहे, त्यांना जबाबदार धरले पाहिजे, असे आमचे ठाम मत आहे. न्यायालयांनी स्वतःहून अशा लोकांविरुद्ध कायदेशीर कारवाई करून त्यांना अटक करण्याचे वॉरंट जारी करणे अत्यावश्यक आहे. शिवाय, आम्ही शासकीय अधिकाऱ्यांना त्यांच्या देश, समाज आणि जनतेप्रती असलेल्या कर्तव्याची आठवण करून देतो. असे भडकाऊ कृत्ये चालू ठेवण्याची मूक मुभा दिल्याने त्यांचे धाडस वाढत आहे, न्याय व शांतीच्या मूल्यांचे पालन करण्यात ते अपयशी ठरत आहेत. सध्याची परिस्थिती सर्वसामान्य नागरिकांसाठी गंभीर अडचणी निर्माण करत आहे, आता समाजाने आपला विवेक जागृत करण्याची वेळ आली आहे.अशा गंभीर स्थितीत गप्प बसणे योग्य नाही. आम्ही समाजातील सर्व घटकांना- वकील, समाजनेते आणि सर्व पार्श्वभूमीतील नागरिकांना आवाहन करतो की त्यांनी आपला आवाज उठवावा. ही फक्त एका समुदायची समस्या नाही, तर संपूर्ण देशाच्या अखंडतेला आणि भविष्याला धोका निर्माण करणारी गंभीर समस्या आहे. एकता, न्याय आणि सामूहिक कृतीच्या माध्यमातूनच आपण या आव्हानांवर मात करू शकतो आणि सर्वांसाठी शांततापूर्ण आणि सलोखायुक्त समाज निर्माण करू शकतो.




## आदेश मोहन नागरे रिद्यामिक योगा स्पर्धेतचे सुवर्ण पदकचे मानकरी



**जालना । प्रतिनिधी -** क्रिडा युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय योगासन स्पर्धाचे आठ ऑक्टोंबर दरम्यान नूतन म हाविद्यालय सेलू जिल्हा परभणी येथे पार पडले १४ वर्षा खालील मुलांच्या रिद्यामि क योगास्पर्धेत आदेश मोहन नागरे याने तिसऱ्यांदा राज्यस्तरीय योगासन स्पर्धे साठी निवड झाली रिद्यामिक योगासन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाउन सुवर्ण पदक प्राप्त केल्या बद्दल सेंट जॉन शाळेचे प्रिन्सिपल शेख मिस,इम्रान सर क्रीडा शिक्षक व योग शिक्षक वैभव आर्य योगगुरू मॉर्निंग ग्रुपचे रवींद्र गुल्लापेल्ली बबलू गुल्लापेली सतीश मेरगु गणेश जाधव कैलास बाले क्रीडा शिक्षक किशोर बिरकायलु गोपनीय. शाखेचे कैलास जावळे , आर्थिक गुन्हे शाखेचे गजानन भोसले गोपाल बिंगी कार्तिक गाडेकर या सर्व योग प्रेमी कौतुक करून स्वागत केले याच्या पुढील स्पर्धेस शुभेच्छा दिल्या

# मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रमात सावळा गोंधळ - दिलीपराव हिवाळे

### अधिकारी आणि कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या संगनमताने भ्रष्टाचाराची शक्यता

**मंठा । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाने राज्यातील शाळांचा दर्जा वाढावा म्हणून माझी शाळा सुंदर शाळेचा उपक्रम हाती घेतला. त्यामध्ये शासनाने सुंदर शाळेसाठी काही निकष ठरवले होते. ज्या शाळा या उपक्रमात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावतील अश्या शाळांना शासनाकडून पैश्याच्या स्वरूपात बक्षीस देण्याची तरतूद करण्यात आली आहे. मंठा तालुक्यात पहिला टप्पा पूर्ण झाल्यावर दुसरा टप्पा सुरु करण्यात आला. दुसऱ्या टप्प्यात केंद्रस्तरीय तपासणी केंद्रप्रमुखांकडून करण्यात आली होती. त्या तपासणीम ध्ये पैशाच्या लोभापाई शाळांचे क्रमांक अधिकाऱ्यांच्या संगनमताने अगोदरच ठरवले गेले होते अशी चर्चा संबंधित गावचे नागरिक आणि तालुक्यात चालू असून या सर्व प्रकारची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी पँथर्स रिपब्लिकन पक्षाचे मंठा तालुका अध्यक्ष दिलीपराव हिवाळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



नुकतीच जालना लाचलुचपत विभागाने गटशिक्षणाधिकारी कार्यालयावर कारवाई करूनसुद्धा कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी त्यातून धडा घेतलेला नाही असे दिसत आहे. नुकतेच रूजू झालेले गटशिक्षणाधिकारी यांचे काम चांगले आहे परंतू कार्यालयातील भ्रष्टाचारी कर्मचारी हे जुनेच आहेत त्यामुळे नविन प्रशासनात अपेक्षित बदल जाणवत नाहीत. यासाठी या सर्वांची हकालपट्टी करणे हाच एक उपाय आहे त्याशिवाय भ्रष्टाचार थांबणार नाही अशी माहिती हिवाळे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी जालना यांना निवेदनाद्वारे दिली.

यासर्व भ्रष्टाचारी कर्मचाऱ्यांची आणि मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात झालेल्या सावळ्या गोंधळाची चौकशी करण्यासाठी आठ दिवसाच्या आत चौकशी समिती स्थापन करून चौकशी करावी अन्यथा शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर आपण आमरण उपोषण करणार असा इशारा हिवाळे यांनी दिला.

## तिरुपती हॉस्पिटल परतूर येथे विनामुल्य सामुदायिक आरोग्य शिबीर संपन्न

**परतूर । प्रतिनिधी -** राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्ष मा. उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस जी (गृह/ विधी व न्याय) यांच्या निर्देशानुसार धर्मादाय आयुक्त जालना, श्री गणपती नेत्रालय, निरामय बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, भाजपा वैद्यकीय आघाडी महाराष्ट्र प्रदेश, आरोग्य भारती, तिरूपती हॉस्पिटल परतूर ह्यांच्या संयुक्त विद्यमानाने तिरुपती हॉस्पिटल परतूर येथे विनामुल्य सामुदायिक आरोग्य शिबीर दि. ०९/१०/२०२४, बुधवार रोजी नरेंद्र मोदी सेवा माह अंतर्गत आयोजित करण्यात आले.

सदरील शिबिराचे उद्घाटन मा. उपमुख्यमंत्री राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्ष सदस्य डॉ. स्वप्नील बी. मंत्री, तिरूपती हॉस्पिटलचे श्री डॉ संजय पुरी, डॉ लता पुरी, डॉ हरिप्रसाद ढेरे वनौषधी प्रचार प्रसार आयाम प्रमुख आरोग्य भारती ह्यांनी केले..

ह्या शिबिर अंतर्गत निर्धन व दुर्बल घटकातील ८७ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी, डोळे तपासणी ४२ जणांचे ECG ७०जणांच्या रक्त तपासण्या करण्यात आल्या

तपासणी अंतर्गत ३० जणांना रेफर केलेल्या रुग्णांना धर्मदाय हॉस्पीटल अंतर्गत निर्धन व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना १,८०,००० पर्यंत मोफत उपचार, ऑपरेशन व ३,६०,००० पर्यंत सवलतीच्या दरात उपचार व ऑपरेशन ह्याबद्दल डॉ मंत्री यांनी व सरकारी योजनांची डॉ पुरी यांनी माहिती दिली.

सदरील कार्यक्रमाचे नियोजन आयुक्त कार्यालय जालनाचे श्री रवी पानपाटील, उपमुख्यमंत्री राज्यस्तरीय विशेष वैद्यकिय मदत कक्षचे सदस्य डॉ. स्वप्नील बी. मंत्री, डॉ संदीप चोपडे, निरामय बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे डॉ संजय पुरी, डॉ लता पुरी गणपती नेत्रालयचे श्री संतोष नाईक, विशेष वैद्यकीय मदत कक्ष तालुका समन्वयक अजित पोरवाल, आरोग्य भारती जालना वनौषधी प्रचार प्रसार आयाम प्रमुख डॉ हरिप्रसाद ढेरे, शिबिराचे निमंत्रक विष्णू गिरी, स्टेमीचे आकाश राठोड, फार्मसी असोसिएशन तालुका अध्यक्ष दत्ता गिरी, अनिल अग्रवाल, रवी देशपांडे, विशाल पवार, रामदास खिंडकर, शैलेश अंभिरे, एचएलएलचे युनूस पठाण, गणपती नेत्रालयचे गणेश जुंगडे ह्यांनी केले. पंचक्रोशीतील नागरिकांनी ह्या शिबिराचा लाभ घेतला.




## महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध अधिनियमांतर्गत गठीत तक्रार समितीचा फलक आस्थापनेच्या दर्शनी भागात लावणे अनिवार्य

**जालना । प्रतिनिधी -** कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम२०१३ अनुषंगाने शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग दि. १९.०६.२०१४ अन्वये प्रत्येक शासकीय / निमशासकीय कार्यालये, महामंडळे, मंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, रुग्णालये, खाजगी क्षेत्र, संघटना, एन्टरप्राईजेस, अशासकीय संघटना, सोसायटी, ट्रस्ट, उत्पादक, पुरवठा वितरण, विक्री, यासह वाणिज्य, व्यवसाईक, शैक्षणिक, करमणूक, औद्योगिक, आरोग्य इत्यादी सेवा किंवा वित्तीय कामकाज पार पाडणारे युनीट किंवा सेवा पुरवठादार, रुग्णालये, सुश्रुषागृहे, क्रिडा संस्था, प्रेक्षागृहे इत्यादी ठिकाणी सदर अधिनियमाचे कलम ६ (१) अन्वये अंतर्गत तक्रार समिती गठीत करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच अंतर्गत तक्रार समिती स्थापन नसेल तर रक्कम रुपये पन्नास हजार इतक्या दंडास पात्र आहेत. महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णय दि. १९ जुन, २०१४ प्रमाणे अंतर्गत तक्रार समिती गठीत करणे अनिवार्य आहे. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व आस्थापनांनी अंतर्गत तक्रार समितीची स्थापना करून अधिनियमाचे कलम १९ (ल) अन्वये सदरील समितीचा फलक कार्यालयाच्या दर्शनी भागात लावावा. दर्शनी भागात लावण्यात येणाऱ्या फलकावर पुढील बाबींची समावेश असणे आवश्यक आहे. यामध्ये कार्यालयाचे नाव, सदरील अधिनियमांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या समितीचा आदेश क्रमांक व दिनांक, अंतर्गत तक्रार समितीचे अध्यक्ष व सदस्यांची नावे, पत्ता व संपर्क क्रं. कायद्यातील तरतुदीचा भंग केल्यानंतर कलमानुसार असलेला दंड व शिक्षा, Women Helpline Number-181, Emergency Response Support System Number- ११२,कार्यालयाचा दुरध्वनी क्रं., नोडल अधिकारी यांचा संपर्क क्रं. इत्यादी असणे आवश्यक आहे. वरील बाबींचा दर्शनी भागात लावण्यात आलेल्या फलकामध्ये समावेश असणे आवश्यक आहे. सदरील फलक लावण्यात आल्याबाबतचा अहवाल फोटोसह सिादर करावेत, असे आवाहन यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## दसरा उत्सव समितीच्यावतीने परतूरात रावण प्रतिमा दहन

**परतूर । प्रतिनिधी -** येथील साईनाथ मंदिराच्या परिसरात विजयादशमी निमित्त वाईट विचाराच्या प्रतिमा दहन या पारंपरीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात होणार असल्याची माहिती दसरा उच्छव समितीचचे अध्यक्ष राजकुमार भारूका, कार्याधक्ष अजय देसाई, सचिव कैलास सोळंके, कोषाधक्ष माणिक जैस्वाल यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. विजयादशमी निमित्त सायंकाळी ६.३० वाजता सदरील कार्यक्रम पार पडणार असून माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर, बागेश्वरी साखर कारखान्याचे चेयरमन, शिवाजी जाधव, कपिलभैय्या आकात, शिवसेना जिल्हाप्रमुख ए जे बोराडे, मा.सुरेशकुमार जेथलीया.राहुल भैय्या लोणीकर, नितीनकुमार जेथलिया, मोहन अग्रवाल, काँग्रेस नेते बालासाहेब आकात, विनायक काळे, प्रा पुरुषोत्तम वायाळ, रामेश्वर नळगे, विजय राखे, माधवराव कदम, वैजनाथ बागल, परेश पाटीलसह अनेक मान्यवाराच्या उपस्तितीत तब्बल ३१ फुटी वाईट विचाराच्या प्रतिमेचे दहन करण्यात येणार आहे. गेल्या २७ वर्षा पासून दसरा उच्छव समितीच्या पुढकाराने सदरील कार्यक्रम प्रति वर्षी अविरत चालू असून विजयादशमी निमित्त सिमोलंगनासाठी या परिसरात नागरिक, महिला, आवाल वृद्ध, बालक गोळा होत असतात. अक्षरशः या परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त होत असतें. नयनरम्य फटाक्याची आताशीबाजी व नयानरम्या विविध रंग उधळणारी फुल फटाक्यांनी हा परिसर दानाणून जात असतो. यंदा या कार्यक्रमात दहा फुटी हुमानाचा वेश परिधान असलेल्या देखवा ठेवाण्यात आला असून यावेळी पंचक्रोशीत भक्तांनी, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्तितीत राहण्याचे आहवन दसरा उच्छव समितीचे राजकुमार भरूका, अजय देसाई, कैलास सोळंके, माणिक जैस्वाल यांनी केले आहे.

## हिना येथील मांडवा देवी येथे हभप रुपालीताई सवने महाराज यांचे कीर्तन

**परतूर । प्रतिनिधी -** तालुक्यातील रोहीणा येथील मांडवा देवी संस्थान येथे दि १२ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी साडे दहा वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार झी टॉकीज फेम हभप रुपालीताई रामेश्वर महाराज सवने यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. मांडवा देवी संस्थान येथे नवरात्र महोत्सव सोहळा साजरा केला जात आहे. या सोहळ्यात दि १२ ऑक्टोबर रोजी हभप रुपालीताई रामेश्वर महाराज सवने यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील भाविकांनी या कीर्तन श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन मांडवा देवी संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.



## नवी मुंबई विमानतळावरील चाचणीवरून ठाकरे आक्रमक

**मुंबई -** आदित्य ठाकरे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांना या चाचणीबाबतही विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना त्यांनी सरकारला धारेवर धरलं. बेकायदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज भारतीय हवाई दलाचे उ-२९५ विमान नवी मुंबई विमानतळावर उतरवले. हे विमान कच्च्या आणि लहान धावपट्टीवरदेखील उतरू शकते. मुळात या विमानतळाचे बांधकाम सुरू आहे. अजूनही विमानतळ पूर्णपणे तयार नाही. यामुळे अशा स्टंटबाजीमुळे भारतीय हवाई दलाचा वेळ आणि करदात्यांच्या पैशाचा खर्च होत आहे.